# प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटीचे आर्ट्स कॉमर्स व सायन्स कॉलेज वेश्वी अलिबाग

# महाराष्ट्र शासन रायगड जिल्हा जनसंपर्क व माहिती अधिकारी अलिबाग

## व

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळा

## " माहितीदूत "

## दिनांक ३ ऑक्टोबर २०१८
## वेळ दुपारी ३ ते ५

विद्यार्थ्यान मार्फत योजना तळागाळापर्यंत पोहचवणार

आता विद्यार्थी बनणार 'माहिती दूत'

माहिती व जनसंपर्क महासंचनालय जिल्हा माहिती कार्यालय, रायगड शिक्षक व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफच्या विद्यमाने प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा माहिती दूत' यांच्या मार्फत एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा पीएनपी संकूलातील सभागृहात आयोजीत करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, जिल्हा समन्वयक मुंबई विद्यापीठ डॉ. मधुकर बडगुजर, पीएनपी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, पीएनपी एम.बी.ए महाविद्यालयाचे प्राचार्य अनुजकुमार मिश्रा, विभागीय समन्वयक मुंबई विद्यापीठ

प्रा. रविंद्र पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता गुरव. आदी मान्यवर उपस्थित होते. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १८ महाविद्यालयांनी सक्रीय सहभाग घेतला होता.

# विद्यार्थ्यांमार्फत योजना पोहोचवणार

**जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांची माहिती**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

विविध शासकीय योजना तळागाळातील जनतेपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी दिली.

माहिती व जनसंपर्क महासंचनालय जिल्हा माहिती कार्यालय, रायगड शिक्षक व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफच्या विद्यमाने प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वेश्वी-अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा माहिती दूत' यांच्यामार्फत एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा पीएनपी संकुलातील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. मिलिंद दुसाने बोलत होते. यावेळी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, मुंबई विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक डॉ. मधुकर बडगुजर, पीएनपी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संजीवनी नाईक, पीएनपी एमबीए महाविद्यालयाचे प्राचार्य अनुजकुमार मिश्रा, विभागीय समन्वयक मुंबई विद्यापीठ प्रा. रवींद्र पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता गुरव आदी उपस्थित होते. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १८ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद दुसाने यांनी सांगितले की, राज्य सरकार आता विविध शासकीय योजना तळागाळातील जनतेपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत पोहोचविणार आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने युवा माहिती दूत हा उपक्रम हाती घेतला असून, राज्यभरातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील एक लाख युवकांमार्फत दोन कोटी जनतेपर्यंत पोहोचविण्याची तयारी केली आहे.

राज्यात सहा हजारांपेक्षा जास्त महाविद्यालये २३ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. त्यापैकी किमान एक लाख युवक या उपक्रमात सहभागी होतील, अशी सरकारची अपेक्षा आहे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांमध्ये एक मार्गदर्शक नेमण्यात येणार आहे. अध्यापक, ग्रंथपाल, अधीक्षक, क्रीडा शिक्षक यापैकी एकाची 'युवा माहिती दूत' मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात येणार आहे, राज्य सरकारने या योजनेसाठी विशेष मोबाईल अप्लीकेशनसुद्धा तयार केले आहे, असेही डॉ. दुसाने यांनी सांगितले.

चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, पीएनपी महाविद्यालयाची या कार्यक्रमासाठी निवड केल्याबद्दल शासनाचे आणि जिल्हा माहिती अधिकारी यांचे आभार व्यक्त केले, तसेच तरुण पिढीमार्फत अशा प्रकारच्या योजना ग्रामीण भागात पोहोचवणे गरजेचे आहे आणि पीएनपीच्या एन.एस.एस. विभागाचे कार्य मोलाचे आहे आणि अशा प्रकारच्या उपक्रमांसाठी पीएनपीचे नेहमीच सहकार्य असेल, असे पाटील यांनी सांगितले.




माहिती व जनसंपर्क महासंचनालय, जिल्हा माहिती कार्यालय मार्फत मार्गदर्शन करताना डॉ. मिलिंद दुसाने. यावेळी चित्रलेखा पाटील, संजीवनी नाईक आदी उपस्थित होते. ( छायाचित्र : अमोल नाईक )




SUCCESS
PLAN
युवा माहिती दुत
एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा


SUCCESS
PLAN
युवा माहिती दुत
एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा


SUCCESS
PLAN


PLAN
युवा माहिती दूत